MHKO180005732014

**नियमीत दरखास्त क्र.१५/२०१४ मधील**

**निशाणी क्र.४५ खालील आदेश.**

**(झाकीर चिरागअली मकानदार व इतर वि. अन्नुबाई सदाशिव चौताळे व इतर.)**

दरखास्तदारांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. दरखास्तदारांचे विद्यमान वकील श्री. ब.रा.कुंभार यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे नमूद केले आहे की, मा. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, जयसिंगपूर यांच्या न्यायालयातील विशेष दिवाणी दावा क्र.२१/२००७ या प्रकरणातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी होवून मिळण्याकरीता प्रस्तुतची दरखास्त दाखल करण्यात आली आहे. प्रस्तुत दरखास्त दाखल करतेवेळी दरखास्तीमध्ये दरखास्तदार क्र.१ व २ यांच्या वडीलांचे नाव 'चिरागअल्ली' ऐवजी 'चिरागअली' असे नजरचुकीने व टंकलेखनातील दोषामुळे चुकीचे नमुद झाले आहे. प्रस्तुतची दरखास्त दाखल केल्यानंतर दरखास्तदारांना उपरोक्त नमूद चुक अवगत झाली. उपरोक्त नमूद चूक टंकलेखनातील दोषामुळे व नजरचुकीने झालेली असल्यामुळे त्याबाबत दरखास्तीमध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता दरखास्तदारांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास ऋणकोंचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास दरखास्तदारांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती दरखास्तदारांच्या विद्यमान वकीलांनी केली आहे.

०३. ऋणकोंनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा व चुकीचा असल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे. ऋणकोंचे विद्यमान वकील श्री. अ.दा.कांबळे यांनी ऋणकोंच्या कथनानुरुप युक्तीवाद केला असून प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०४. दरखास्त, प्रस्तुत अर्ज व त्यावरील ऋणकोंनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दरखास्त दाखल करतेवेळी दरखास्तदारांकडून दरखास्तीमध्ये दरखास्तदार क्र.१ व २ यांच्या वडीलांचे नाव 'चिरागअल्ली' ऐवजी 'चिरागअली' असे नजरचुकीने व टंकलेखनातील दोषामुळे चुकीचे नमुद झाल्यामुळे त्याबाबत दरखास्तीमध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता दरखास्तदारांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही प्रस्तुतची दरखास्त गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, दरखास्तदारांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे ऋणकोंचे कोणतेही नुकसान

होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. दरखास्तदारांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज एक हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. दरखास्तदारांनी पुढील तारखेपर्यंत दरखास्तीमध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन दरखास्तीची दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी. तसेच, दुरुस्त दरखास्तीची प्रत्येकी एक प्रत ऋणकोंना द्यावी.

३. दरखास्तदारांनी खर्चाची रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) ऋणकोंना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.04.23 13:22:44 +0530

दिनांक : २३.०४.२०२६
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,
कुरुंदवाड.